महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट राज्य, मुंबई.
कार्यालय महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, व्यवस्थापकीय संचालक
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर-४४००२२
दूरध्वनी क्र.०७१२-२९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL184705 ई-मेल : mahajyotingp@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2838 /२०२३ दि.२८/१२/२०२३

# -: परिपत्रक :-

**विषय : महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट "ब" व "क" २०२३-२४ प्रशिक्षण तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) प्रशिक्षण २०२३-२४ करिता प्रतिक्षा यादी**

महाज्योतीद्वारा राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट "ब" व "क" २०२३-२४ आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) प्रशिक्षण २०२३-२४ प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवडसूची यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापी, निवडसूचीतील काही उमेदवार रुजू न झाल्यामूळे उमेदवारांच्या जातप्रवर्गानुसार प्रतिक्षायादी यासह प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रतिक्षायादीनुसार निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांना नेमून दिलेल्या प्रशिक्षण केंद्रावर दि.०१/०१/२०२४ ते ०५/०१/२०२४ पर्यंत रुजू व्हावे. प्रशिक्षण केंद्रावर हजर राहून विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यास नवीन प्रतिक्षायादी लावून उमेदवारांची निवड करण्यात येईल.

**महत्त्वाचे : काही विद्यार्थ्यांची मूळ निवडसूची प्रसिध्द करतांना प्रशिक्षण केंद्राची निवड केलेली नव्हती. त्यामुळे अशा उमेदवारांचा मूळ निवडसूचीत समावेश होवू शकला नव्हता. प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यापूर्वी सर्वच विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र निवडण्याची सुविधा पुन्हा नव्याने उपलब्ध करुन देण्यात आली होती. ही पार्श्वभूमी विचारात घेता काही प्रवर्गाच्या बाबतीत मूळ अंतिम निवड गुण (Cut-Off Marks) पेक्षा प्रतिक्षायादीतील अंतिम निवड गुण (Cut-Off Marks) हे जास्त असू शकतात, ही बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.**

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्यातिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर